# राजश्री शाहू महाराजांची शिक्षणसंबंधी विचारधारा

**लेफटनंट प्रा. डॉ. एम. आर. खोत** व्यावसायिक अर्थशास्त्र विभाग व राष्ट्रीय छात्र सेना विभागप्रमुख, स. का. पाटील सिंधुदुर्ग महाविद्यालय, मालवण.

शाहूमहाराजांचा जन्म 26, इ. स. रोजी कागल येथील घाटगे घराण्यात झाला. त्यांचे नाव यशवंत. त्यांच्या वडिलांचे नाव जयसिंघराव (अप्पासाहेब), आईचे नाव राधाबाई होते. कोल्हापूर संस्थानांचे राजे जयसिंग चौथे शिवाजी महाराज यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या पत्नी आनंदीबाई यांनी 17 मार्च, इ. स. 1884 रोजी यशवंतरावाना दत्तक घेतले व शाहू हे नाव ठेवले. एप्रिल 2, इ. स. 1894 रोजी त्यांचा राज्यारोहण समारंभ झाला. राज्याभिषेक झाल्यानंतर इ. स. 1922 सालापर्यंत म्हणजे 28 वर्ष ते कोल्हापूर संस्थानांचे राजे होते. मुंबई येथे मे 6, इ. स. 1922 रोजी त्यांचे निधन झाले.

शाहूमहाराजांचा 26 जून हा जन्मदिवस सामाजिक न्याय दिवस म्हणून पाळला जातो. त्या दिवशी कोल्हापूरमध्ये आणि अन्यत्र काही ठिकाणी बरेच सार्वजनिक कार्यक्रम होतात. घाटगे घराणे इतिहास प्रसिध्द आहे. शूरवीरांची खाण असलेले हे घराणे. लखमोजी व रामजी हे या घराण्याचे पूर्वज एक दातेरसद घेऊन बेदरास निघाले होते. घाटातील बिकट वाट तुडवीत ते पुंढे चालले होते. इतक्यात घाटात शत्रूंने त्यांना अडविले. दोघांनी दोन हात केले आणि घाट घेतला म्हणूनच त्यांना पुढे घाट, घे– घाटगे असे आडनाव पडले. याच घाटगे घराण्यात 26 जुलै 1874 रोजी यशवंतराव बाबासाहेब या नावाचे मूल जन्मास आले.

2 एप्रिल सन 1894 रोजीची गोष्ट या दिवशी शाहूमहाराजांनी आपल्या संस्थांच्या कारभाराची सूत्रे हाती घेतली. ही आनंदाची गोष्ट तमाम लोकांना कळावी म्हणून महाराजांनी जाहीरनामा काढला. त्यामध्ये महाराजांनी म्हटले आहे की, आमची सर्व प्रजा सतत तृप्त राहून सुखी असावी तिथ`कल्याणाची सतत वृध्दी व्हावी व आमच`संस्थानाची हर एक प्रकारे सदोदित भरभराट होत जावी अशी आमची निकट इच्छा आहे. आपला जाहिरनामा प्रसिध्द झाल्यानंतर शाहूमहाराज जीवन भर लोककल्याणासाठी झिजले आणि म्हणूनच एक लोककल्याणकारी राजा म्हणून आज शाहूमहाराजांची ख्याती आहे.

कोल्हापूर स्टेशनवरुन महाराजांचा रथ चालला होता. समोरुन पाच सात मुले येत होती. त्यापैकी काही जए सिगरेट ओढत होती. महाराजांचा रथजवळ येताच सर्वमुले घाबरली महाराज मुलांना म्हणाले–उद्या सकाळी वाडयावर या हे एकूण तर सगळयांची पाचावर धारण बसली. कारण काय मिळणार आहे व ते उघडच होते. वाडयावर गेल्यावर कोण ओढत होता सिगारेट? अस`महाराज प्रत्येकाला दरडावून विचारत होते. प्रत्येकाने मला सोडून सर्वजण सिगारेट ओढत होते असे उत्तर दिले. शेवटी मी सिगारेटओढली नाही असे मोठया निर्भयतेने एका मुलाने उत्तर दिले तो मुलगा महाराजांपुढे उभा राहिला. महाराजांनी त्याच्या पाठीवर थाप मारुन शाबासकी दिली. हा मुलगा म्हणजे कर्मवीर भाऊराव पाटीलांनी बहुजन समाजाच्या अंगणापर्यत शिक्षणाची गंगा नेऊन पोहचवली.

शाहूमहाराज मागासलेल्या जातीतील लोकांना अगोदर नोकरी देत असत हे पाहून महाराजांचे एक मित्र श्री गणपतराव अभ्यंकर म्हणाले– अहो महाराज नोकरी देताना माणसाच्या जातीकडे पाहू नये, त्याच्या पात्रतेकडे व शिक्षणाकडे पहावे यावर महाराज काहीच बोलले नाहीत. ते आपल्या मित्रास घेऊन त्याच्या पात्रतेकडे व शिक्षणाकडे पाहावे यावर महाराज काहीच बोलले नाहीत. ते आपल्या मित्रास घेऊन सरळ घोडयाच्या पागेत आले मोतदाराला पागेतील सगळी घोडी मोकळी सोडावयास सांगितली त्या घोडयापुढे हरभऱ्याची चंदी पसरुन ठेवली जो घोडी दांडगी व बळकट होती. ती अगोदर धावत आली. त्यांनी सर्व चंदीचा फडशा पाडला. पणजी घोडी दुबळी व पांगली होती. त्यांना मात्र दांडग्या घोडयाच्या लाथा खायला मिळाल्यानंतर शाहूमहाराज म्हणाले चंदीची गरज जशी पागळया घोडयांना आह`तशी नोकरीची गरज मागासलेल्या जातीमधील माणसांना आह हे एकूण गणपतराव गप्प बसले.

दिनांक 14 सन 1920 सालची गोष्ट महाराज विलायतेस जाणार म्हणून कोल्हापूरच्या रेल्वेस्टेशनवर त्यांना निरोप देण्यासाठी माणसांची एकच गर्दी उसळली होती. स्टेशनच्या दुसऱ्या बाजून`लोक आत येऊ नये म्हणून तेथ`लांबलचक दोर बांधले होते. त्या दोरांकडे महाराजांची सहज नजर गेली. त्या गर्दीमध्ये एक विद्यार्थी उभा होता. महाराजांनी त्यास जवळ बोलावून घेतले आणि स्वतः जवळउभे राहिलेल्या रावसाहेब विचारेना महाराज म्हणाले, हे पहा, विचारे माझ्या सांगण्यावरुन हा विद्यार्थी पुण्याच्या कॉलेजमध्ये शिकतो आहे. मी त्यास स्कॉलरशिप देत होतो. पण त्याने ती घेतली नाही. या विद्यार्थ्यास पैशाची गरज लागली तर त्याला लागतील तेवढे पैसे द्या. मी तुमचे पैसे दुप्पट परत करीन. या विद्यार्थ्यांच`नाव आहे पी. एस. पाटील पांडुरंग चिमणाजी पाटील पुढे ते पुणे येथील शेतकी महाविद्यालयाचे प्राचार्य झाले.

शिक्षणाशिवाय या समाजाचा उध्दार होणार नाही या विचाराने प्रेरित होऊन ते काम करीत होते आणि म्हणूनच एक शिक्षणप्रेमी राजा म्हणून सारा महाराष्ट्र महाराजांना ओळखतो.

सन 1920 सालची ही गोष्ट शाहूमहाराज सोनतळीवर होते. हत्ती घोडयाची कशी काय व्यवस्था केली आहे ते पाहत होते. इतक्यात तेथे एक मुलगा आला आणि म्हणाला मी मांगाचा मुलगा आहे. मला शाळा शिकायची आहे. महाराज म्हणाले, उद्या सकाळी वाडयावर ये मग बघू. सकाळी वाडयावर जाऊन मुलाने महाराजांना मुजरा केला. त्यावेळी महाराजांना भेटण्यासाठी वाडयावर अनेक लोक आले होते. त्यामुळे आपली डाळ शिजणार नाही असे त्या मुलास वाटले. मुलगा निराश होऊन उभा होता. एवढयात सगळी कामे आटपून महाराज मोटारीत बसून बाहेर निघाले. मोटार सुरु होताच महाराज म्हणाले. अरे त्या मांगाच्या पोराला बोलवा. मुलाला मोटारीत घेऊन महाराज आर्य समाजाच्या गुरुकुल वसतिगृहासमोर आले. त्यांनी तेथील वसतिगृह प्रमुख श्री. निंबाळकर यास बोलावून

सांगितले. या मुलाला शिक्षणाची सर्व व्यवस्था करा. 24 तासाच्या आत महाराजांनी त्या मुलाच्या शिक्षणाची सर्व सोय केली. त्या मुलाच `नाव आहे कृष्णाजी मोरे. मागासलेल्या मुलांसाठी वसतिगृह काढून महाराजांनी त्यांना सतत शिक्षणास उत्तेजन दिले.

शाहूमहाराज एकदा शिकारीस गेले होते. जंगलात काही मांग व बेरड जातीने गुन्हेगार लोक राहत होते. दुपारची वेळ होती. महाराज थकून एका झाडाखाली बसले होते. तळावर जेवणाची सोय होती पण तळ फारदूर होता. दूरवर टेहाळणी करणारा एक मनुष्य महाराजांनी पाहिला. महाराजांनी त्यास बोलावून घेतले. त्यांनी वस्तीतल्या शिवाय बेरडाला बोलवायला सांगितले. तास शिव्या बेरड धावत आला. महाराजांनी त्याला सांगितले शिव्या फार भूक लागली आहे. भाकरी कोरडयास असेल तर आण मग तो घरी असेल ते अन्न घेऊन आला. महाराजांच्यापुढे अन्नाचा ढीग लागला. महाराजांनी ते अन्न खाल्ल्यामुळे सर्वानापण ते अन्न खावे लागले.

एक विद्यार्थी मूळचा कोकणचा 1118 साली मुंबई विद्यापीठातून बी. ए. झाला. त्याला उच्चशिक्षणासाठी अमेरिकेला जायाची इच्छा होती. पण मार्ग सुचत नव्हता. शेवटी शाहूमहाराजांकडे येऊन त्याने आपली इच्छा व्यक्त केली. शिक्षणासाठी परदेशी जाणाऱ्या विद्यार्थ्यांना महाराज मदत करीत असत. परंतु अनुभव काही चांगला नव्हता. त्यामुळे महाराज त्या विद्यार्थ्यास महाराज मदत करण्यास काही तयार होईनात. परंतु माझ्यावर एक प्रयोग करुन पहा. मला स्वावलंबनाने उच्चशिक्षण घेण्यास संधी द्या, असेतो विद्यार्थी`आग्रहाने सांगू लागला. महाराजांनी खाजगीतून 2000 रु. देण्याच`मान्य केल`पण हा विद्यार्थी आपल्या संस्थानतला असू दे. नाहीतर संस्थानाबाहेरचा असू द्या. स्वावलंबाने शिक्षण घेणाऱ्यालाच मदत केलीच पाहिजे या विचाराने महाराजांनी त्या विद्यार्थ्याला दोनहजार रुपये दिले. हा विद्यार्थी म्हणजे आपल्या महाराष्ट्रच नामवंत शिक्षण तज्ञ सीताराम रावजी तावडे होय.

कोल्हापूर म्हणजे कलावंताचे माहेरघर, मल्लाचे मोहळ, विद्यार्थी वसतिगृहांची गंगोत्रीच. सन 1986 साली महाराजांनी सर्व जातीजमातीसाठी एकच वसतिगृह सुरु केले. पण वसतिगृहाच्या प्रमुखांनी ब्राम्हण जाती खेरीज कोणत्याच विद्यार्थ्याला तेथ`प्रवेश दिला नाही. ही गोष्ट महाराजांच्या मनाला लागली. मग त्यांनी प्रत्येक जातीसाठी एक अशी एकूण 20 विद्यार्थी वसतिगृहे सुरु केली. या कामामुळेच शाहूमहाराजांना भारतातील विद्यार्थी वसतिगृहाच`जनक असे म्हटले जाते.

सोनतळी तळावरील गोष्ट. तळावर सर्वांना पिण्याचा पाण्याचा एक हौद होता. तेथे देखील फक्त स्पृश्य लोकच तेथे पाणी भरत अस्पृश्य लोकांना पाणी भरण्यास मनाई केली जाई. जवळपास कोणी नाही हे पाहून एक अस्पृश्य बाई तेथे आली. पाणी प्याली आणि घागरीतून पाणी भरुन तेथून निघाली. हे ठसका लागला पाणी आणा, पाणी आणा असे महाराज ओरडू लागले. एकाने त्या बाईच्या घागरीतील पाणी महाराजांना दिले. महाराज पाणी प्याले. मग जमलेल्यांना महाराज म्हणाले. तुम्ही तक्रार केली त्याच घागरीतील पाणी मला पाजले. आता मी बाटलो. तुम्ही मात्र शुध्दच राहिलात, आता काय करायचे? हे एकताच महाराजांच्या लटक्या ठस्क्याची युक्तीसर्वांना समजली आणि सर्वांच्या डोक्यात प्रकाश पडला.

तळावरची गोष्ट तेथे स्पृश्य आणि अस्पृश्य सेवक राहत असत. तळावर पाण्याचा एक तलाव होता. एक वर्षी पाऊस फार कमी पडला. त्यामुळे तलावाचे पाणी आटले. मग सगळे स्पृश्य अस्पृश्य एकाच तलावावर पाणी भरु लागले. मग हळूहळू उभय जातीमध्ये भांडण सुरु झाली ही गोष्ट महाराजांच्या कानावर गेली. एके दिवशी महाराज त्या तलावावर गेले. तेथे एक अस्पृश्य सेवक उभा होता. महाराज त्यास म्हणाल`असे तू शिवलेल्या तलावातील तांब्याभर पाणी आण कसे लागते ते बघूया. महाराजांना पाणी द्यायचे धाडस त्याच्यात काही आले नाही. मग महाराजांनी स्वतःच जाऊन पाणी पिले व आपल्या अधिकाऱ्यास बोलावून म्हणाले काय हो महाराने हौद शिवला म्हणून पाणी काही कडू लागत नाही हे ऐकून अधिकारी शरमला.

लोकमान्य टिळक वारले ही वार्ता महाराजांना समजली. महाराजांनी टिळकांच्या दिवसाच`वेळी नवी वस्त्रे त्यांच्या घरी पाठवली. सर्वजण चकीत झाले. काही जण म्हणाल`टिळकांच्या मरणानंतरही त्यांच्याशी वैर साधून महाराजांना काय मिळणार आहे? हीगोष्ट एका सरदाराने महाराजांच्या कानावर घातली. महाराज म्हणाले, छत्रपती कधी परक्यांचे सुतक पाळत नाही पण जवळच्या अप्ताचे पाळतो. त्यांच्या घरातील सर्व माणसाला नवे कपडे पाठविण्याची आमची रीत आहे. गेलेला माणूस गेला नाही. त्यांच्या जागी आम्ही आहोत हे समजण्यासाठी नवे कपडे घाला आणि दुःख विसरुन जा, असे आम्ही सांगतो.

मुक्काम काटकोळ येथे महाराजांचा एकदा तळ होता. सगळया गावात फासेपारध्यांनी चोऱ्यामाऱ्या करण्याचा सपाटा लावला होता. महाराजांनी सर्व फासेपारध्यांना अटक केली. अटकेत असताना त्यांना चांगले अन्न, वस्त्र दिले. काही दिवसांनी एका फासेपारध्याला बोलावून विचारले. अर`चोऱ्यामाऱ्या का करता? त्याचे उत्तर जगण्यासाठी आम्हांला हे करावेच लागते. मग उद्योग का करत नाही? पक्षी मारतो. पण त्यावर पोट भरत नाही. दुसरा धंदा येत नाही. म्हणून चोऱ्यामाऱ्या करायच्या असतात का? पोटात भुकेचा डॉब उसळला की, दुसर काहीच सुचत नाही हे एकूण महाराजांचे हृदय द्रवले त्यांनी सर्वफासेपारध्यांना तळावर आणले व त्यांना घरी शिधा सुरु केली.

कार्तिक महिन्यातील गोष्ट कडक थंडीचे ते दिवस तरी देखील महाराज भल्या पहाटे उठत कार्तिक स्नानासाठी पंचगंगा नदीवर जात. स्नान झाल्यावर मंत्र सांगण्यासाठी एक ब्राम्हण ही त्यांच्याबरोबर असे एकदा काय झाले की, ता`भटजी स्वतः स्नान न करताच मंत्र सांगू लागला. महाराज म्हणाले, भटजीबुवा मंत्र सांगण्याआधी तुम्ही स्नान का करत नाही? हे एकूण भटजीबुवा जागा झाला. ता`म्हणाला, वेदातील मंत्र म्हणावयाचे असतील तर स्नान नाही केल`तरी चालते. महाराज आपण शुध्द आहात. त्यामुळे आपल्याला पुराणातील मंत्र चालतात. भटजीचे हे शब्द एकूण महाराजांच्या मनात खोलवर जखम झाली. धर्माच्या नावावर ब्राम्हण पुरोहित समाजाला कसे पिळतात, याची महाराजांना कल्पना आली.

एकदा एक इंग्रज अधिकारी शाहूमहाराजांना म्हणाला, मी माझ्या ऑफीसमधील सर्व शिपायांना स्वतःची सही करण्याइतके लिहतावाचता आल्याशिवाय पगार देत नाही. आता माझ्या ऑफीसमधील सर्व शिपाई स्वतःची सही करुन पगार घेतात. यावर शाहूमहाराज म्हणाले, जसे नकली नाणे बाजारात चालविणे धोक्याचे असते. तसे सहीपुरते शिक्षण धोक्याचे असते. कागदावरील मजकूर वाचता आला नाहीतर नुसती कागदाखाली सही करुन आपत्ती ओढवून घेण्यासारखेच आहे.

सन 1190 ते 1920 पर्यंतचा काळ. यावेळी आपला देश पारतंत्रात होता. समाजाला पारतंत्र्यातची जाणीव व्हावी व स्वातंत्र्याची आस मनात निर्माण व्हावी, यासाठी शाहूमहाराज प्रयत्न करीत होते. शिक्षणप्रसारातून समाज घडवित होते. आपल्या संस्थानाच्या बाहेर देखील महाराजांच`समाजविकासाचे काम चालू होते अशा कामामुळे मागेपुढे धोका निर्माण होईल अशी त्यावेळच्या इंग्रज सरकारला भिती वाटू लागली. तेव्हा महाराजांनी संस्थांनांनी हद्दीबाहेर समाजसुधारणेचा पसारा वाढवू नये, असे इंग्रज सरकारने सल्ला दिला. त्यावर शाहूमहाराज म्हणाले वेळच आली तर जनतेच्या हितासाठी मी सिंहासनावरुन खाली येईन. पणजनतेच्या हिताचे काम मी हाती घेतले आहे ते सोडणार नाही.

सन 1919 पासून शाहूमहाराजांचा जीवन वृक्ष वटत चालला होता. त्यांना कशातच आनंद वाटेनासा झाला. तरीही केवध्ह कर्तव्यासाठी ते जगत होते. मुंबई येथील 6 मे 1922 च्या रात्रीची गोष्ट रात्र कसली काळरात्रच होती ती! करण महाराज मृत्युच्या बिछान्यावर पडून होते. शेवटी ते एवढेच बोलले. मी जाण्यास तयार आहे. डर कूच नाही सबको सलाम बोलो यानंतर थोडयाच वेळात शाहूमहाराजांची जीवन ज्योत मालवली.

लोकांचा राजा गेला म्हणून सर्व लोक शोकसागरात बुडून गेले.

**समारोप :–**

राजर्षी शाहूमहाराज म्हणजे लोकांचा राजा या राजाने लोकांची सुख दुःखे आपलीच आहेत, असे मानले होते आणि म्हणूनच वंचित व उपेक्षित लोकांच्या उद्धारासाठी ते धडपडले दुर्बल व शोषितांना मदत केली. लोकजागृतीसाठी लोकशिक्षण सुरु केले. श्रमजीवी लोकांच्या मनावर प्रेमाची फुंकर घातली. जात, गोत, धर्म यांच्या बंधनात अडकून पडलेल्या माणसालावर काढले. माणूस येथून तेथून सर्वत्र सारखाच आहे हे आग्रहाने सांगितले. असा माणसांसाठी अहोरात्र राबणारा राजा होता. शाहू छत्रपती! ळा जेवढा थोर राजा होता. त्याहून ही थोर माणूस होता. त्यामुळेच आज त्याचे जीवन कार्य दीपस्तंभासारखे आम्हांस खरी वाट दाखवित आहे.

**संदर्भ :–**

1)www.variouswebsite

2)Various books